डॉ. सतिश धनाजी पवार, सह संचालक,
आरोग्य सेवा या संवर्गात पदस्थापना
देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः नामनि-**२०११**/प्र.क्र.**३७९**/**११**/सेवा-**२**
गो.ते.रुग्णालय इमारत संकुल, दहावा मजला
मंत्रालय,मुंबई
दिनांक : २० जानेवारी,२०१८

वाचा :- १) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. नामनि-१२१३/प्र.क्र.२३३/सेवा-२, दि. २८.०६.२०१३.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन आदेश क्र. नामनि-२०११/प्र.क्र.३७९/सेवा-२, दि. १६.०१.२०१८.

प्रस्तावना:-

डॉ. सतिश धनाजी पवार यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीनुसार संचालक, आरोग्य सेवा, मुंबई या पदावर प्रलंबित न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये नियुक्ती देण्यात आली होती. मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. १२०५९/२०१७ व इतर प्रकरणी दि. १२.०१.२०१८ रोजी डॉ. सतिश पवार यांचा संचालक, आरोग्य सेवा, मुंबई या पदाचा कार्यभार अन्य ज्येष्ठ अधिकाऱ्याकडे सोपविण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. त्यानुसार संचालक, आरोग्य सेवा, मुंबई या पदाचा कार्याभार संदर्भ क्र. २ अन्वये आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडे तात्पुरत्या स्वरुपात सोपविण्यात आला आहे. डॉ. सतिश पवार यांचेकडील संचालक, आरोग्य सेवा, मुंबई या पदाचा कार्यभार आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडे सोपविल्याने डॉ. सतिश पवार यांची सह संचालक, आरोग्य सेवा (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ७६००) या त्यांच्या मुळ संवर्गात पदस्थापना करुन त्यांची अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई (वेतनश्रेणी रु. ३७४००-६७००० ग्रेड पे रु. ८७००) हे पद श्रेणी अवनत करुन त्या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदस्थापना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार संचालक, आरोग्य सेवा, मुंबई या पदाचा कार्यभार आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडे दि. १६.१.२०१८ च्या आदेशान्वये सोपविण्यात आला आहे. त्यानुसार डॉ. सतिश पवार, यांना त्यांच्या मुळ सह संचालक संवर्गात पदस्थापना देऊन त्यांची पदस्थापना अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय

नागरी आरोग्य अभियान (वेतनश्रेणी रु. ३७४००-६७००० ग्रेड पे रु. ८७००) हे पद सह संचालक, आरोग्य सेवा (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु.७९००) या वेतनश्रेणीमध्ये श्रेणी अवनत करुन पुढील आदेश होईपर्यंत अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई या पदावर करण्यात येत आहे.

डॉ. सतिश पवार, सह संचालक, आरोग्य सेवा यांना अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई या पदावर नियमित पदोन्नतीचा हक्क सांगता येणार नाही. अथवा सेवा ज्येष्ठतेचा दावा करता येणार नाही. तसेच अतिरिक्त अभियान संचालक पदाची वेतनश्रेणी मिळणार नाही.

डॉ. सतिश पवार यांनी त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे व त्याबाबतचा अहवाल आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई व शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्र. २०१८०११९१७४५१०६८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe5189556b7a95d5896bbb81496f403bb58ac3e, cn=Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2018.01.20 12:09:07 +05'30'

(वि.पुं.घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति
डॉ. सतिश धनाजी पवार, सह संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रझलय, मुंबई
३) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

४) आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना, मुंबई
६) प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई
७) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
८) सहसंचालक/उपसंचालक, आरोग्य सेवा, (सर्व)
९) मा. मंत्री, (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०) मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११) जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व)
१२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३) महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१५) सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) अवर सचिव/कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) निवडनस्ती सेवा-२